


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ● वर्ष : ०६ ● अंक : २६३ ● शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ ● किंमत : ३ रूपये ● पाने : ४


## ऑनलाइन फसवणूक केलेल्या आरोपीस अटक

**बार्शी शहर : हॅलो प्रभात**

तीन वर्षांपूर्वी बार्शीतील एका शिक्षकाची मोबाईल फोनवरून फसवणूक करत बँकेतील १ लाख ९८ हजार २०८ रुपये विनापरवाना काढणाऱ्या संशयित आरोपीस बार्शी पोलिसांनी दिल्ली येथून अटक केली आहे. नरेश महेशचंद्र शर्मा (वय ४५, रा. बगीची रघुनाथ, नॉर्थ दिल्ली) यास बार्शी शहर पोलिसांनी दिल्लीतून ताब्यात घेतले. शुक्रवारी (ता. २६) त्यास प्रथम वर्ग न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. १३ फेब्रुवारी २०२२ रोजी फिर्यादी महादेव विठ्ठल मिरगणे (वय ५३, रा. गाडेगाव रोड, बार्शी) यांना क्रेडिट कार्ड ब्लॉक करण्यासाठी मोबाईलवर आलेला ओटीपी सांगा, असे शर्मा याने सांगितले. त्यावरून मिरगणे आणि ओटीपी सांगताच क्रेडिट कार्डवरून १ लाख ९८ हजार २०८ रुपये डेबिट झाल्याचा मेसेज आला. त्यानंतर मिरगणे यांनी बार्शी शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास सायबर पोलिसांकडे होता.

# अखेर युतीचा फॉर्म्युला ठरला!

### मुंबईत भाजप-एकनाथ शिंदे एकत्र लढणार?

**मुंबई : हॅलो प्रभात**

बहुचर्चित मुंबई महानगरपालिका निवडणुका लढवण्यासाठी युतीचा फॉर्म्युला ठरला आहे. शिवसेना आणि भाजपमध्ये मागच्या काही दिवसांपासून बैठकांचं सत्र सुरु होतं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकांमध्ये मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वात प्रतिष्ठेची मानली जाते. मुंबई महापालिकेवर झेंडा फडकवणाऱ्या पक्षाची भले राज्यात सत्ता नसेल पण राजकारणात एक वेगळं महत्व असतं. मागच्या अनेक वर्षांपासून मुंबई महापालिकेत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची सत्ता होती. पण 2022 साली शिवसेनेत फूट पडली. शिवसेनेच पक्ष आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण आता एकनाथ शिंदेंकडे आहे. उद्धव ठाकरे यांना मशाल हे नवीन निवडणूक चिन्ह घ्यावं लागलं आहे. विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसला. राज्यभरात त्यांचे फक्त 20 आमदार निवडून आले.

मुंबई हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानले जायचा. पण आता हा गड शाबूत राहिलेला नाही. इथे भाजपने आपला पाया मजबूत केला आहे आणि आता शिवसेना शिंदे गटाने सुद्धा प्रवेश केला आहे. त्यामुळे यंदाची पालिका निवडणूक दोन्ही ठाकरे बंधुंसाठी अस्तित्वाची लढाई आहे म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. उद्धव ठाकरे यांचे आजच्या घडीला मुंबईत 10 आमदार आहेत, तेच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे 6 आमदार आहेत. भाजपचे सर्वाधिक 15 आमदार आहेत. भाजपला



काहीही करुन मुंबई महापालिकेवर भगवा झेंडा फडकावायचा आहे. त्यामुळे यंदाच्या पालिका निवडणुकीत ते आपली सर्व ताकद पणाला लावतील यात शंका नाही.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषदा आणि नगर पंचायत निवडणुकीत महाविकास आघाडीचे सर्वात खराब कामगिरी केली. त्यात उद्धव ठाकरे गटाची सर्वात सुमार कामगिरी होती. त्यामुळे पालिका निवडणुका त्यांच्यासाठी सोप्या असणार नाहीत. समोर भाजप, शिंदेंसारख्या बलाढ्य पक्षांच आव्हान आहे. दरम्यान मुंबई पालिका निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना जागा वाटपासंदर्भात महत्वाची बातमी आहे.

युतीचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. मुंबई महापालिकेत 227 वॉर्ड आहेत. त्यात भाजप 140 जागा लढवेल. शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला 87 जागा येतील. आरपीआयला भाजपच्या कोट्यातून जागा मिळतील अशी सूत्रांची माहिती आहे. भाजपचा 150 जागांसाठी प्रयत्न आहे. पण त्यांना 140 वर समाधान मानावे लागेल अशी सूत्रांची माहिती आहे. विधानसभा निहाय कुठल्या वॉर्डातून कोण निवडणूक लढवणार या बद्दल अजून स्पष्टता नाही.

## प्रशांत जगताप यांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

**पुणे : हॅलो प्रभात**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात शरद पवार गटात सुरू असलेल्या राजकीय चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पुण्याचे माजी महापौर आणि शरद पवार गटाचे माजी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आज अधिकृतपणे काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. प्रसारमाध्यमाशी बोलताना प्रशांत जगताप यांनी आपल्याला उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन्ही पक्षांकडून प्रवेशाची ऑफर असल्याचे सांगितले होते. पुढील तीन ते चार तासांत अंतिम निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी



स्पष्ट केले होते. मात्र, अखेर दोन्ही नेत्यांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करत त्यांनी काँग्रेसमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार यांनी आमदारांसह सत्तेत सहभाग घेतला असताना, पुण्यात प्रशांत जगताप यांनी शरद पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी पुण्यात शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात आघाडी करण्याचा निर्णय झाल्यानंतर जगताप यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ही आघाडी झाली तर पक्षाचा राजीनामा देईन, असा इशाराही त्यांनी दिला होता. यानंतर शरद पवार गटाकडून त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न झाले, मात्र आपली भूमिका ठाम ठेवत प्रशांत जगताप यांनी अखेर पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. गेल्या दोन दिवसांत ते कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क सुरू होते. उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी रात्री फोनवर संपर्क साधल्याचेही जगताप यांनी सांगितले होते. तरीही अंतिम निर्णय घेत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या घडामोडीमुळे पुण्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता असून, आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

## भाजपचे माजी नगरसेवक उदय जोशी यांचे निधन

**पुणे : हॅलो प्रभात**

■ येरवडा कारागृहात असताना त्रास, ससूनमध्ये उपचारादरम्यान मृत्यू



भाजपचे माजी नगरसेवक व सदाशिव पेठेतील निनाद नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक उदय त्र्यंबक जोशी (६३) यांचे शुक्रवारी सकाळी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ठेवीदारांची ५ कोटी ४३ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या उदय जोशी यांची येरवडा कारागृहात रवानगी झाली होती. जोशी हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. आजारपणामुळे त्यांना जामीन मंजूर करण्यात यावा, असा अर्ज त्यांच्या वकिलांनी शिवाजीनगर न्यायालयात सादर केला होता, शुक्रवारी त्या अर्जावर सुनावणी होणार होती. त्यांना जामीन मिळण्याची शक्यता असतानाच सुनावणीपूर्वीच उपचादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## जावळ काढण्याच्या प्रथेत आईचेही बळजबरीने मुंडन

**वासुंदे : हॅलो प्रभात**

रोटी (ता. दौंड) येथील ग्रामदैवत रोटमलनाथ मंदिरामध्ये पुर्वापार चालत आलेल्या शितोळे घराण्यातील मुलाच्या जावळाचा विधी करण्यासाठी रोटी येथील कुलदैवत श्री रोटमलनाथ व जोगेश्वरी मंदिरात येतात. हा शितोळे घराण्यातील मुलाच्या जावळाचा कार्यक्रम एखाद्या लग्नकार्याप्रमाणे केला जातो. यावेळी मामाच्या मांडीवर बसवून बोरल्या मुलाचे केस कापले जातात आणि मुलाच्या आईचेही केस अर्पण करण्याची शितोळे घराण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. मात्र याच वर्षानुवर्षे चालत आलेल्या जावळ काढण्याच्या परंपरेतील बाळाच्या आईचे केस काढण्याच्या प्रथेबाबत आईचे संक्तीने मुंडन केले जाते. याबाबत काही महिलांनी राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली. धार्मिक परंपरेच्या



■ दौंडमधील महिलांची राज्य महिला आयोगाकडे तक्रार

नावाखाली महिलेला विद्रुप करत असताना तिच्यावर एक कौटुंबिक, मानसिक, सामाजिक दबाव टाकला जातो. खऱ्या अर्थाने तिच्या जगण्याचा अधिकार हिरावून घेतला जातो. या सर्वांचा दबाव तिच्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात असतो की, तिला सक्तीने विद्रुप केले जाते. म्हणून राज्य महिला आयोगाच्या वतीने याची दखल घेत पुणे जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार केला.

## तब्बल ६८ लाखांच्या मालाचा छडा ; ७२ तासांत गुन्ह्याची उकल

### एका आरोपीला अटक

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत रांजणगाव येथील गोडाऊनमधून चोरी झालेल्या तब्बल ६८ लाख रुपयांच्या मालाचा छडा लावला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, अवघ्या ७२ तासांत गुन्ह्याची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रांजणगाव येथील चमाडिया गोडाऊनमध्ये आयटीसी कंपनीचा सिगारेट, बिस्किटे, साबण व इतर वस्तूंचा मोठा साठा ठेवण्यात आला होता. हा माल ट्रान्सपोर्टच्या माध्यमातून डिलर्सकडे पाठवला जातो. माल वाहतुकीसाठी मुव्हिंग लॉजिस्टिक कंपनीची चार इलेक्ट्रिक पिकअप वाहने वापरली जात असून, रात्रीच्या वेळी



ही वाहने मालासह आणि चलनासह गोडाऊन परिसरात उभी ठेवण्यात येतात. याच संधीचा फायदा घेत १७ डिसेंबर रोजी पहाटे अज्ञात चोरट्याने माल भरलेले एक इलेक्ट्रिक पिकअप वाहन सुरू करून गेटवर चलनाची नोंद करत थेट वाहनासह सुमारे ६५ लाख रुपयांचा माल चोरून नेला.

या घटनेनंतर रांजणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासासाठी पोलिसांनी विविध पथके तयार करून तपासाची चक्रे फिरवली. तपासादरम्यान चोरट्यांनी चोरी केलेले पिकअप वाहन गोडाऊनपासून काही अंतरावर सोडून दिल्याचे, तसेच त्यामधून सुमारे ५४ लाख रुपये किमतीच्या सिगारेट घेऊन फरार झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या प्रकरणात परिसरातील १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. तपास सुरू असतानाच संबंधित वाहन डिलिव्हरीसाठी नेत असताना वाघोली परिसरात आढळून आले. त्यानंतर वाहनाचे मालक, सुपरवायझर आणि चालकांची चौकशी करण्यात आली.

या चौकशीत सुपरवायझर प्रथमेश चव्हाण याने आरोपी दिपक ज्ञानेश्वर ढेरंगे आणि अल्ताफ आयुब मुल्ला यांना चोरीसाठी वाहन दिल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी प्रथमेश ज्ञानेश्वर चव्हाण याला अटक केली आहे. तपासात आरोपीकडून चोरीस गेलेला माल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन असा एकूण ६८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास रांजणगाव पोलीस ठाणे करत आहे.

## पुण्यात नव्या-जुन्यांची धडधड वाढली

### भाजप आमदारांनी उघडले उमेदवारांचे पत्ते

**भाजपचे शहरात 99 नगरसेवक होतो. त्यातील जवळपास 40 तो 45 नगरसेवकांची उमेदवारी धोक्यात आहे. त्यामुळे कसबा, कोथरूड, खडकवासला या मतदारसंघात नवे चेहरे मिळण्याची शक्यता आहे, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून खासगीत सांगितले जात आहे. पुणे आणि पिंपरीतील विधानसभानिहाय जागांची चर्चा झाली. शिवसेना, 'रिपाइं'ला किती जागा द्यायच्या यावर चर्चा केली. आमदारांची मते जाणून घेतली आहेत.**

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महापालिका निवडणुकीतील उमेदवार निश्चित केले जात असताना भाजपमध्ये स्थानिक आमदारांना विश्वासात न घेता काही पक्षप्रवेश करून घेण्यात आल्याने प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत वादावादी झाल्याचे प्रकार घडले आहेत. त्यानंतर भाजपच्या कोअर कमिटीने प्रत्येक आमदारांसोबत अर्धा तो एक तास स्वतंत्रपणे चर्चा करून प्रभागातील उमेदवारांबाबत मतो जाणून घेतली. त्यांची नाराजी दूर करतानाच प्रत्येक प्रभागातील आमदारांची पसंती कोणत्या उमेदवाराला आहे, हे जाणून घेण्यात आले. या बैठकीत संभाव्य उमेदवारांची यादी तयार केली असली तरी यावर उमेदवारांची नावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच अंतिम करणार आहेत. यासाठी मुंबईत बैठक होणार आहे. भाजपच्या कोअर कमिटीची बैठक आपटे रस्त्यावरील एका तारांकित हॉटेलमध्ये रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, निवडणूक प्रमुख गणेश बिडकर आदी उपस्थित होतो. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, त्यामुळे भाजपने उमेदवार यादी अंतिम करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. आतापर्यंत खडकवासला, वडगाव शेरी, कसबा, कोथरूड, हडपसर या मतदारसंघातील प्रभागांसाठी बाहेरच्या पक्षातील पदाधिकारी, माजी नगरसेवकांना पक्षात घेतले आहे. या प्रवेशावरून शहरातील आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रवेश झालेले माजी नगसेवक वरचढ ठरणार असल्याने पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. शहरात आठ पैकी भाजपचे सहा आमदार आहेत. या प्रत्येक मतदारसंघातील कोणत्या प्रभागात कोण उमेदवार असला पाहिजे हे समजून घेण्यासाठी स्थानिक आमदारांकडून प्रत्येक प्रभागातून चार नावे मागविण्यात आली. ज्या नावांवर एकमत आहे अशा नावांची स्वतंत्र यादी तयार केली जाणार असून, प्रदेशच्या बैठकीत त्यास मान्यता घेऊन उमेदवारांची नावे जाहीर केली जाणार आहेत.

आमदारांच्या यादीत असलेले नाव पक्षाने केलेल्या सर्वेक्षणात मागे पडल्याचे समोर आल्यास तोथे कोअर कमिटीच्या शिफारशीद्वारे उमेदवारी निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारी यादी जाहीर होईपर्यंत सस्पेन्स कायम राहण्याची शक्यता आहे. तसेच ज्या प्रभागात उमेदवारी कुणाला द्यावी यावरून मतभेद आहेत, त्याचा निर्णय राज्यातील प्रमुख नेतो घेणार आहेत.

## संक्षिप्त...

### "प्रशांतभाऊने फार मोठी चूक केली"

**पुणे : हॅलो प्रभात**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र निवडणुका लढणार असल्याच्या चर्चांना उधाण आले असून, हालचालींना वेग आला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले तर राजकारण सोडेन, असे विधान पुण्याचे माजी महापौर प्रशांत जगताप यांनी केले होते. नुकताच त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून, ते काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. त्यांच्या राजीनाम्यावर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी आपले मत मांडले आहे. "प्रशांतभाऊने फार मोठी चूक केली", असे स्पष्ट मत रुपाली पाटील ठोंबरे यांनी प्रशांत जगताप यांच्या राजीमान्यावर मांडले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकच निष्ठावंत आहे का? असा सवालही त्यांनी केला आहे. वरिष्ठांचे आदेश मानले पाहिजेत, असेही त्या म्हणाल्या आहेत.

### पुणे महापालिकेकडून ४७७३ घरांचे बांधकाम

**पुणे : हॅलो प्रभात**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील 2,918 पुणेकर कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न भारतीय जनता पक्षाच्या काळात मार्गी लागले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वी पूर्ततेनंतर आता पुणे महापालिकेतर्फे आणखी 4,773 घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. या घरांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर एकूण लाभार्थी कुटुंबांची संख्या 7,691 वर जाईल. देशात कोणीही बेघर राहू नये, प्रत्येकाचे स्वतःचे घर असावे या भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री आवाज योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पांत बाजारभावापेक्षा कमी दराने अल्प उत्पन्न गटातील पात्र लाभार्थ्यांना घरे दिली जातात. या घरांसाठी केंद्र सरकारकडून दीड लाख रुपये आणि राज्य सरकारकडून एक लाख रुपये, असे एकूण अडीच लाख रुपयांचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाते.

### तिकीट मागायला येऊच नका : गडकरी

**नागपूर : हॅलो प्रभात**

आगामी महापालिका निवडणुकीसाठी नागपुरात भाजपमध्ये तिकिटांची मारामार कशी सुरू आहे, याविषयीचा एक किस्सा सांगत केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात हशा पिकविला. मी किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकट्याने ठरवून तिकीट देऊ शकत नाही. स्वतः किंवा आपल्या बायकोसाठी टिकीट मागायला येऊच नका लोकांनी तिकीट तुम्हाला द्या, असा आग्रह धरला पाहिजे, असा सबुरीचा सल्ला पदाधिकारी कार्यकर्त्यांना दिला. आम्ही मनपा निवडणुकीच्या काळात कधीकाळी तिकिटाच्या निमित्ताने समोरच्या कार्यकर्त्यांकडून चहा, नाश्ता घेत होतो. गिरीश याचा साक्षीदार आहे. मला आताच दिलेल्या माहितीनुसार एकाच कुटुंबात चार सदस्यांनी तिकीट मागितले आहे. यात नवरा, बायको, मुलगा आणि बहिण असे चार जण आहेत. मी त्यांना सांगितले आणखी दोन जण सुटले एक म्हणजे त्यांचा ड्रायव्हर आणि दुसरा एखादा चमचा...! कधीकाळी लढण्यासाठी उमेदवार मिळत नसलेल्या पक्षात आज एका तिकिटासाठी 50 दावेदार हे चित्र असल्याचे गडकरी यांनी सांगत कार्यकर्त्यांनी स्वतःपेक्षा पक्ष, देशहित महत्त्वाचे समजावे या दृष्टीने उपयुक्त मार्गदर्शन केले.

# संपादकीय

## भीतीतून झालेली एकजूट

गेल्या विधानसभा निवडणुकांपासून जे दोन भाऊ एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या, ते अखेर शुक्रवारी अधिकृतरीत्या एकत्र आले. राज्यात दीर्घकाळ रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विधानसभा निवडणुकीनंतरच होणार, हे आधीपासून स्पष्ट होतं. विधानसभा निवडणुकीत फारसं हाती लागणार नाही, हे लक्षात आल्यानंतर किमान मुंबई महापालिकेसाठी तरी एकत्र येणं अपरिहार्य आहे, याची जाणीव दोघांनाही झाली. अमित ठाकरे यांचा माहीम मतदारसंघातील पराभव हा या निर्णयाला अधिक बळ देणारा ठरला.

मूळ शिवसेनेने आधी मुंबई महापालिकेवर सत्ता मिळवली आणि त्यानंतर महाराष्ट्रभर विस्तार केला, हा इतिहास दोघांच्याही लक्षात आहे. त्यामुळे, मुंबई महापालिकेची निवडणूक प्रतिष्ठेची लढवली नाही, तर राजकीय अस्तित्वच धोक्यात येईल, या भीतीतून ही एकजूट झाली आहे. म्हणूनच या एकत्र येण्याला 'भीतीसंगम' म्हटलं जातं, आणि ते वर्णन पूर्णपणे योग्य आहे.

ही अवस्था केवळ ठाकरे बंधूंची नाही. विधानसभा निवडणुका आणि त्यानंतर नगर परिषद-नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेनेने निर्माण केलेल्या राजकीय वादळामुळे सर्वच विरोधी पक्ष गोंधळलेले दिसत आहेत. महानगरपालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून या पक्षांची सुरू असलेली धावपळ पाहिली, तर निवडणुकीनंतर त्यांची अवस्था काय असेल, याचा अंदाज आत्ताच येतो.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसची स्थिती तर अधिकच संभ्रमाची आहे. आपण नेमकं कुठे आहोत, कोणाबरोबर आहोत आणि किती दूर जाणार आहोत, हेच त्यांना उमगत नाही. मुंबईत ठाकरे बंधूंनी नकार दिल्यानंतर आता काँग्रेसकडे 'घेता का बरोबर?' अशी विचारणा सुरू आहे. तर मुंबईबाहेर पुतणे अजित पवार यांच्यामार्फत महायुतीशी गुपचूप संधान बांधलेलं आहेच.

काँग्रेसला नगरपालिका निवडणुकांमध्ये अपेक्षेपेक्षा चांगलं यश मिळालं असलं, तरी महापालिकांमध्ये काय होईल, याबाबतच पक्षात अनिश्चितता आहे. जिल्हावार नेत्यांची अधांतरी विधानं त्याचंच द्योतक आहेत. राज्यपातळीवरील नेतृत्व आणि स्थानिक नेते यांच्यात संवादच नाही. निष्ठावान कार्यकर्ते आणि मतदार काय भूमिका घेतात, यावरच काँग्रेसचं भवितव्य अवलंबून आहे.

अशा बेभरवशाच्या, कोणतीही खात्री नसलेल्या 'लॉटरी'सारख्या यशासाठी उबाठाचे सर्व शक्य प्रयत्न झाले. मात्र, 'मनसेसह आघाडी शक्य नाही,' असा स्पष्ट संदेश काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिल्यानंतर हे प्रयत्न काहीसे थंडावले. अन्यथा 'मरता, क्या नहीं करता?' या न्यायाने जमेल तिथून ताकद गोळा करण्याचा प्रयत्न सुरूच होता. कारण, त्याशिवाय निवडणुकीत निभाव लागणार नाही, याची त्यांना पूर्ण खात्री आहे. भाऊ म्हणून एकत्र येणं, कुटुंब एकत्र दिसणं हे ठीक आहे. पण हा राजकीय देखावा किती खरा आहे? त्यात परस्परांवरील विश्वास किती आहे? हे मनसैनिकांना विचारल्यावर वेगळीच कथा ऐकू येते. मागील अनुभवांवरून 'कधी, कुठे दगाफटका होईल सांगता येत नाही,' अशीच भावना आजही आहे. एकत्र येणं खरंच मनापासून असतं, तर जागावाटपाच्या चर्चेला एवढी लांबण लागली नसती. उलट, जागावाटपात इतके गुंतले गेले की नगरपालिका-नगर परिषद निवडणुकांसाठी प्रचारालाही कोणी बाहेर पडलं नाही.

या निवडणुका कार्यकर्त्यांच्या मानल्या जातात. मात्र, कार्यकर्त्यांसाठी वेळ काढायला कोणीच तयार नव्हतं. आता युती जाहीर झाली असली, तरी जागावाटपाचं गुंतागुंतीचं गणित अजूनही सुटलेलं नाही. जिथे दोन भाऊ मनाने आणि विश्वासाने एक होऊ शकत नाहीत, तिथे पक्ष विश्वासाने कधी एकत्र येणार?

सगळा गाजावाजा मुंबई-ठाणे-पुणे-नाशिक-संभाजीनगरमधील मतांसाठी आहे. पण तिथल्या मतदारांनी यांना मत का द्यावं, या प्रश्नाचं उत्तर यांच्याकडे नाही. मराठी मतांच्या ध्रुवीकरणावर सगळी भिस्त आहे; पण दोघे एकत्र आले तरी ते शक्य दिसत नाही. कारण, त्यांच्या कारकिर्दीत मुंबई, नाशिकची काय अवस्था झाली, हे मराठी माणसाने पाहिलं आहे. त्यांच्या धोरणांमुळे मराठी माणूस मुंबईबाहेर ढकलला गेला, आणि तो आज इतर नेतृत्वाकडे वळलेला आहे.

मुंबईतील मतदार आज व्यवहारिक आहे. अडचणीला जो पक्ष दाराशी येईल, त्याच्याकडे तो वळतो. त्याची हिंदू अस्मिता जागृत आहे आणि विविध प्रांतातून आलेल्या हिंदू बांधवांशी त्याचे हितसंबंध जोडलेले आहेत. मतदाराचे निर्णय अनेक घटकांवर आधारित असतात. त्या सगळ्या गणितात केवळ 'कुटुंब एकत्र आलं' यामुळे किती फरक पडणार? शेवटी प्रश्न एकच आहे—लोकांसाठी, कार्यकर्त्यांसाठी तुम्ही नेमकं काय केलं? त्या प्रश्नाचं उत्तर शून्य असेल, तर कितीही शून्यांची बेरीज केली, तरी निकाल बदलणार नाही.

# मुंबई महापालिकेसाठी ७५ हजार कर्मचाऱ्यांची फौज

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबई महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी तब्बल ७५ हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार असून त्यापैकी सुमारे ५८ हजार कर्मचाऱ्यांना आतापर्यंत निवडणूक कर्तव्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दि. २९ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. निवडणूकविषयक प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात मुंबई महापालिका अधिनियमातील कलम २८ (क) अन्वये फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा कडक इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे. महापालिका निवडणुकीसाठी अवघे २० दिवस उरले असून प्रशासनाची लगबग सुरू आहे. मुंबई महापालिकेची व्याप्ती मोठी असून २२७ प्रभागांमध्ये ही निवडणूक होणार आहे. यासाठी ११ हजार १२२ मतदान केंद्रे उभारली जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीत १० हजार १११ मतदान केंद्रे होती, त्यामानाने यंदा मतदान केंद्रांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करावे लागणार आहे. एकूण ७५ हजार कर्मचाऱ्यांपैकी सुमारे १० हजार कर्मचारी सध्या निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आले असून उर्वरित कर्मचारी मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी कार्यरत राहणार आहेत. आतापर्यंत आदेश मिळालेल्या ५८ हजार कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सहा दिवस चालणार असून दररोज सुमारे १० हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, निवडणूक कर्तव्यावरून कर्मचाऱ्यांनी, विशेषतः शिक्षकांनी, नाराजी व्यक्त केली आहे. तरीही प्रत्येक विभाग कार्यालयातून ४० ते ४५ कर्मचारी, तसेच महापालिकेच्या प्रत्येक विभागातून १५ ते २० शिक्षक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. आरोग्य विभागातून केवळ लिपिक वर्गातील कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यासाठी घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत ७३०४ मतदान केंद्रे असून ४१ हजार ९८० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्या तुलनेत यंदा मतदान केंद्रे आणि कर्मचारी संख्येत मोठी वाढ झाली आहे. निवडणूक कर्तव्याचे आदेश रद्द किंवा बदलासाठी कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे स्पष्ट करत प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास कठोर कारवाईचा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.



## पाटण विधानसभा मतदारसंघात संवाद मेळाव्याचे आयोजन

### पालकमंत्री शंभूराज देसाई करणार मार्गदर्शन

**सातारा : हॅलो प्रभात**

सूर्यकांत पाटणकर

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे पर्यटन,खनिकर्म व माजी सैनिक कल्याणमंत्री तथा सातारा जिल्हयाचे पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये जिल्हा परिषद गट निहाय पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या संवाद मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.या संवाद मेळाव्यास लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा.यशराज देसाई, मोरणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.रविराज देसाई उपस्थित राहणार असून या मेळाव्यांमध्ये आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले जाणार आहे.शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता तारळे जिल्हा परिषद गटाचा मेळावा स्वराज मंगल कार्यालय,कोंजवडे फाटा येथे, दुपारी १२ वाजता म्हावशी जिल्हा परिषद गटाचा मेळावा मेंढोशी,ता. पाटण, दुपारी २ वा. गोकूळ तर्फ हेळवाक जिल्हा परिषद गटाचा मेळावा लोकनेते बाळासाहेब देसाई ग्रामसचिवालयाजवळ येराड ता.पाटण तर सायंकाळी ०५ वा. मारुलहवेली जिल्हा परिषद गटाचा मेळावा लोकनेते बाळासाहेब देसाई शताब्दी स्मारक दौलतनगर या ठिकाणी तसेच रविवार दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मल्हारपेठ जिल्हा परिषद गटाचा मेळावा लोकनेते बाळासाहेब देसाई ग्रामसचिवालयासमोर मल्हारपेठ, दुपारी १२ वाजता तांबवे जिल्हा परिषद गटाचा मेळावा लक्ष्मीपुत्र मल्टीपर्पज हॉल तांबवे फाटा, दुपारी ०२ वाजता मंद्रुळकोळे जिल्हा परिषद गटाचा मेळावा बाजारतळ ढेबेवाडी व सायं. ०४ वा. काळगाव जिल्हा परिषद गटाचा



बाजारतळ तळमावले ता.पाटण या ठिकाणी होणार आहे.तरी पाटण विधानसभा मतदारसंघातील तमाम शिवसैनिक,युवा सेना पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी व कार्यकर्त्यासह सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठया संख्येने संवाद मेळाव्यांच्या ठिकाणी उपस्थित रहावे,असे आवाहन शिवसेना जिल्हा प्रमुख जयवंतराव शेलार यांनी प्रसिध्दीपत्रकांत देण्यात आले आहे.

## शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करणाऱ्याला अटक

**पुणे : हॅलो प्रभात**

ख्रिसमस पार्टी करण्याची बतावणी करून १३ वर्षीय शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाला काळेपडळ पोलिसांनीअटक केली. कुतबुद्दीन अली महंमद (७२, रा. महंमदवाडी, हडपसर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या आईने हडपसरमधील काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महंमद हा महंमदवाडीतील एका सोसायटीत राहायला आहे. तक्रारदार महिला याच सोसायटीत राहायला आहे. बुधवारी (दि. २४) रात्री साडेआठच्या सुमारास आरोपी ज्येष्ठ नागरिकाने मुलीला त्याच्या घरी बोलावून घेतले. 'ख्रिसमस पार्टी करायला घरी येशील का? तुला चॉकलेट देतो', असे आमिष त्याने मुलीला दाखवले. त्यानंतर मुलीला घरात बोलावून घेतले. घराचा दरवाजा बंद करून त्याने मुलीशी अश्लील कृत्य केले. घाबरलेल्या मुलीने या घटनेची माहिती आईला दिली. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक निंबाळकर करत आहेत.

## मुळशीचे पाणी पुण्यात कसे येणार? जलसंपदा विभागासमोर दोन पर्याय

**पुणे : हॅलो प्रभात**

मुळशी धरणातून सात टीएमसी पाणी शहराला देण्याचा प्रस्ताव अंतिम मान्येतच्या प्रतिक्षेत असताना हे पाणी पुण्यापर्यंत कसे आणता येईल, यावरही जलसंपदा विभागाकडून विचार सुरू आहे. मुळशी धरणाचे पाणी पुणे शहरापर्यंत आणण्यासाठी दोन पर्याय पुढे आले आहेत, त्यापैकी एक पर्याय म्हणजे पाइपलाइनद्वारे पाणी आणणे तर दुसरा पर्याय मुळशी ते खडकवासला धरणापर्यंत ३० किलोमीटर लांबीच्या बोगद्वारे पाणी आणणे. या दोनपैकी एक पर्यायाची व्यावहारिकता तपासूनच पुढे पाऊले टाकण्यात येणार आहे. वाढते पुणे शहर, शहरालगतच्या गावांमध्ये वेगाने होणारे नागरीकरण यामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी वाढलेली आहे. सद्यःस्थितीत पुणे शहराला खडकवासला प्रकल्प, म्हणजे खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच, खडकवासला धरणातून दौंड, इंदापूर आणि हवेली तालुक्यांमधील शेतीसाठी कालव्यातून पाणी सोडण्यात येते. मागील काही वर्षांपासून भामा आसखेड धरणातून पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यात येतोय. मात्र, वाढत्या नागरीकरणामुळे पिण्याच्या पाण्याची मागणी सातत्याने वाढत चालली आहे. त्यामुळे पुढील 20 वर्षांचा विचार करून मुळशी धरणातून पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर गांभीर्याने विचार सुरू आहे.

## संजय राऊतांनी हिंदुत्वाबद्दल ऊर बडवणे थांबवावे

### भाजपाच्या नवनाथ बन यांची टीका

**मुंबई : हॅलो प्रभात**

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी प्रखर हिंदुत्वाचा पुरस्कार केला. उद्धव ठाकरेंनी अजान स्पर्धा, नमाज पठण स्पर्धेचे आयोजन केले, मुंबईत मराठी भवन बाजूला उर्दू भवन निर्मिती करणे, राशिद मामूला पक्षात प्रवेश दिला हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. मतांसाठी इतकी लाचारी करणाऱ्या उद्धव ठाकरेंनी आणि संजय राऊतांनी आता हिंदुत्वाबद्दल ऊर बडवणे थांबवावे, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. मराठी माणसाला बेदम मारहाण करणे, खिचडी घोटाळ्यासारखे असंख्य घोटाळे करणे, पत्रा चाळ घोटाळा करून मराठी माणसाला बेघर करणे हे राऊतांचे हिंदुत्व आहे का असा प्रहारही श्री. बन यांनी केला.

यावेळी श्री. बन म्हणाले की, भाजपाचे हिंदुत्व हे सर्वांनी पाहिले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंदुत्वाचा गजर आणि त्यासोबतच विकास या धोरणानुसार काम केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने राम मंदिर बांधले, 370 कलम हटवून दाखवले. सामान्य माणसाला हिंदुत्वाचे रक्षण कोण करत आहे हे चांगलेच ठाऊक आहे.



नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुका यांच्या निकालानंतर संजय राऊत यांनी पराभवाच्या भीतीतून रोज उठून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपावर तथ्यहीन आरोप करणे सुरू केले असून त्यांच्या अस्वस्थतेचा हा स्पष्ट पुरावा आहे अशी बोचरी टीकाही श्री. बन यांनी केली. भाजपासोबत युतीत असलेले लोकंच भाजपाचा पराभव करण्यास इच्छुक असल्याचे बिनबुडाचे वक्तव्य करणा-या राऊतांना लक्ष्य करत श्री. बन यांनी संजय राऊतांना खडे बोल सुनावले. नगर पालिका, नगर पंचायत निवडणुकांमध्ये मतदारांनी उबाठा गटाचे पानीपत केले आहे. याच निवडणुकीत भाजपा आणि संपूर्ण महायुतीने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाच्या पाठीशी राज्यातील 14 कोटी जनतेचे कायम आशीर्वाद आहेत. कोणी कितीही बाष्कळ आरोप केले तरी मुंबईचा विकास फडणवीस आणि महायुती सरकारच करू शकते हा विश्वास जनतेला असल्याने मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपा, महायुतीचाच विजय होईल, असा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला.

# दौंड पंचायत समितीचा अजब कारभार?

### पंधरा हजार द्या, बिल काढतो ; शेतकऱ्यांचा गंभीर आरोप



**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड तालुक्यात मनरेगा योजनेंतर्गत विहीर मंजुरीसाठी आणि राहिलेले अर्धवट बिल काढण्यासाठी थेट लाचेची मागणी होत असल्याचा धक्कादायक आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. राहिलेले आर्धे बिल आणि विहीर मंजूर हवी असेल तर पंधरा हजार द्या, नाही तर तुमची फाईल हलणार नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगितल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. अनेक शेतकरी नाव न सांगण्याच्या अटीवर दैनिक हॅलो प्रभात प्रतिनिधीशी बोलताना या प्रकाराला दुजोरा देत आहेत.

या वर्षी उत्पादन घटल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेला असतानाच विहीर मंजुरीसाठी आणि राहिलेल्या निम्म्या पैशांसाठी अतिरिक्त पैशाची मागणी होऊ लागल्याने शेतकरी वर्ग आणखी संकटात ढकलला जात आहे. कर्ज फेडू का ? विहीर मंजुरीसाठी पैसे देऊ का ? नाहीतर आत्महत्या करु ? असा हताश सवाल काही शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना केल्याचे समजते. शेतकऱ्यांच्या मते, काही रोजगार सेवकच ठेकेदारासारखे वागत आहेत. विहिरीची मोजणी कमी दाखवली जात असूनही त्यांची बिलं वेगाने निकाली काढली जातात. मात्र, ज्या शेतकऱ्यांनी पैसे दिले नाहीत, त्यांच्या प्रस्तावांना जाणीवपूर्वक लांबणीवर टाकले जाते. या गैरकारभारात काही कर्मचारीही सहभागी असल्याचा आरोप होत आहे.

तक्रार केली तर विहीर मंजूर होत नाही, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये पसरल्यामुळे ते उघडपणे आवाजही उठवू शकत नाहीत.

त्यामुळे संपूर्ण प्रशासनाविषयी असंतोष वाढत चालला आहे. या भ्रष्ट कारभारात सामील असलेल्या संबंधित कर्मचारी व रोजगार सेवकांवर कठोर कारवाई करावी, तसेच मनेरगा योजनेंतर्गत विहीर मंजुरीची प्रक्रिया पारदर्शक करावी अशी जोरदार मागणी शेतकरीवर्गातून होत आहे. प्रशासनाने या गंभीर आरोपांची तात्काळ चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची वेळ आली आहे. याविषयीची सखोल माहिती घेण्यासाठी दौंड गटविकास अधिकारी अरुण मरभळ यांच्याशी भ्रमणध्वनी वरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## भाजपमध्ये उमेदवारीवरून हालचाली स्थानिक आमदारांची नाराजी

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करताना भाजपमध्ये अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. स्थानिक आमदारांचा विश्वास न घेता काही बाहेरच्या पक्षांतील पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्याने वाद निर्माण झाला असून, यामुळे आमदारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या कोअर कमिटीने प्रत्येक आमदारासोबत स्वतंत्र चर्चा करून संबंधित प्रभागातील उमेदवारांबाबत मते जाणून घेतली. संभाव्य उमेदवारांची यादी तयार करण्यात आली असली तरी अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असून, त्यासाठी मुंबईत बैठक होणार आहे. अप्टे रस्त्यावरील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये रात्री उशिरापर्यंत कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, निवडणूक प्रमुख गणेश बिडकर आदी उपस्थित होते.

उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने उमेदवार यादी अंतिम करण्याची घाई सुरू आहे. खडकवासला, वडगाव शेरी, कसबा, कोथरूड, हडपसर या मतदारसंघांत बाहेरून आलेल्या माजी नगरसेवकांमुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे. शहरातील आठपैकी सहा आमदार भाजपचे असून, प्रत्येक प्रभागातून चार नावे मागवून एकमताने ठरलेल्या नावांची यादी प्रदेश पातळीवर पाठवली जाणार आहे. पक्षाने केलेल्या सर्वेक्षणात काही आमदारांची नावे मागे पडल्यास कोअर कमिटीच्या शिफारशीनुसार उमेदवारी निश्चित केली जाणार आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय, स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **पुणे संपर्क :** ८५५१०५५११३
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

# "भाजपाच्या पाठिंब्याशिवाय शिंदेसेना जिंकू शकत नाही"

**मुंबई : हॅलो प्रभात** : मीरा भाईंदर महापालिका निवडणुकीत भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी महायुतीसाठी समन्वय समिती गठीत केल्या नंतर भाजपाआमदार नरेंद्र मेहता यांनी पत्रकार परिषदेत युतीसाठी अटीशर्ती जाहीर केल्या आहेत. भाजपाची एकही अशी जागा नाही जी शिवसेनेच्या बळावर जिंकून येईल. परंतु शिवसेनेच्या जागा भाजपच्या पाठिंब्या शिवाय निवडून येऊ शकत नाही असे आ. मेहता म्हणाले. त्यामुळे भाजपा जिल्हाध्यक्ष पाठोपाठ आ. मेहतांनी देखील मीरा भाईंदर मध्ये शिंदेसेनेशी युती होणार नाही अशी भूमिका कायम ठेवली आहे. मीरा भाईंदर महापालिकेत आपलेच एकहाती वर्चस्व रहावे आणि युतीच्या बेड्यात अडकू नये अश्या प्रकराची भूमिका भाजप आ. मेहता यांनी घेतलेली दिसतेय. ९५ पैकी भाजपा कडे ६५ नगरसेवक व शिवसेने कडे १७ नगरसेवक असल्याने ६५ जागा भाजपाला, १७ जागा शिंवसेनेला व उरलेल्या १३ जागा सम प्रमाणात वाटून घ्यायच्या असा फॉर्म्युला त्यांनी सुरवातीला दिला होता. मेहतांच्या फॉर्म्युल्यावर मंत्री सरनाईक यांनी, २०१७ साली शिवसेनेचे २२ नगरसेवक असले तरी आता ताकद वाढली असून ५० टक्के जागा हव्या अशी भूमिका मांडली. आ. मेहतांनी संकल्प सभा घेऊन निवडणूक प्रचाराचा नारळ फोडत मंत्री सरनाईक यांच्यावर नाव न घेता आरोप व टीका केली आणि भाजपा स्वबळावर लढण्याचे संकेत दिले होते.

# धानोरी-कळसच्या प्रभागात होणार काटे की टक्कर

## टिंगरे विरुद्ध टिंगरे होणार लढत : भाजपात महिला उमेदवारीसाठी रस्सीखेच

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

आगामी होणाऱ्या पालिका निवडणुकीत धानोरी-कळस प्रभागात प्रामुख्याने पुरुष गटात टिंगरे विरुद्ध टिंगरे अशी लढत रंगण्याची चिन्ह स्पष्ट झाल्याने प्रभागातून या दोन उमेदवारांमध्ये काटे की टक्करची लढत होणार असून महिला सर्वसाधारण व अनुसूचित जाती प्रवर्गात गटात उमेदवारी मिळविण्यासाठी महिला उमेदवारीमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



वडगावशेरी विधानसभा मतदार संघात विविध पक्षातील राजकीय नेत्यांच्या खराडी-वाघोली प्रभाग क्रमांक ४ व विमाननगर-लोहगाव प्रभाग क्रमांक ३मधून खऱ्या अर्थाने होणाऱ्या पालिका निवडणुकीत या प्रभागातून विविध पक्षातील उमेदवारांमध्ये अटीतटीच्या लढती रंगणार असल्या तरी पण यापूर्वी २००७मध्ये काँग्रेस, २०१२मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा प्रभाग क्रमांक एक धानोरी-कळस हा सध्या भाजप पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात आहे. २०१७रोजी झालेल्या पालिका निवडणुकीत माजी नगरसेवक अनिल टिंगरे यांनी चार उमेदवारांपैकी तीन उमेदवार निवडून आणण्यास सिंहाचा वाटा उचलून त्यांच्या रूपाने इतर दोन उमेदवारांना देखील पालिका सभागृहात जाण्याची संधी मिळाली होती.ते दोन वेळेस धानोरी प्रभागातून निवडून आले असून सध्या होणाऱ्या निवडणुकीत ते हॅट्ट्रिक करण्याच्या मार्गावर असल्याने त्यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्यंतरीच्या काळात त्यांनी विविध उपक्रम प्रभागात राबविले असतानाच प्रभागात गेल्या दहा वर्षापासून नगरसेवकपद भूषवित असताना या पदाचा दांडगा अनुभव त्यांनी पाठीशी विकासकामांना चालना देऊन प्रभागातील अनेक प्रश्न मार्गी लावले असतानाच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मोलाचे सहकार्य करत राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना प्रभागातून मोठे मताधिक्य मिळून दिले आहे.

टिंगरे यांनी लोकसभा निवडणुकीत या भागातून मिळून दिलेले मताधिक्य ही त्यांची जमेची बाजू असल्याने त्यांच्या पाठीशी पक्षश्रेष्ठींचे असलेले पाठबळ व प्रभागात केलेली विकासकामे हे सगळे सांगून जात असले तरी पण आगामी होणाऱ्या पालिका निवडणुकीत त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस(अप) पक्षाचे उमेदवारीचे दावेदार म्हणून पाहिले जाणारे शशिकांत टिंगरे यांचे कडवे आव्हान उभे राहणार आहे.कारण २०१२पासून हातून निसटलेला हा बालेकिल्ला ताब्यात मिळविण्यासाठी पक्षप्रमुखांनी कंबर कसली आहे. शशिकांत टिंगरे हे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व मतदार संघाचे माजी आमदार सुनील टिंगरे यांचे कट्टर समर्थक मानले जात असतानाच दोन्ही राष्ट्रवादी शहरात एकत्र येण्याचे संकेत मिळत असल्याने टिंगरे यांना पाठबळ मिळत असून घटक पक्षाची देखील साथ त्यांना लाभणार असून त्यांनी देखील प्रभागात कार्यकर्त्यांची फौज भक्कम करून पालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची जय्यत तयारी केली असताना समाजातील गोरगरीब नागरिकांसाठी गेल्या काही वर्षापासून गरीब रुग्णांना एक रुपयात दवाखाना हा राबवत असलेला उपक्रम नागरिकांच्या आज ही चर्चेत आहे.याचबरोबर पक्षाच्या कार्यक्षम नगरसेविका व पालिका निवडणुकीत हॅट्ट्रिक करून तीन वेळेस निवडून आलेल्या रेखा टिंगरे यांची देखील त्यांना मोलाची साथ मिळणार आहे. त्यामुळे प्रभागात भाजपचे अनिल उर्फ बॉबी टिंगरे व राष्ट्रवादीचे शशिकांत टिंगरे या दोन्ही उमेदवारांचे पारडे समसमान असले तरी पण प्रभागातून कोण? बाजी मारणार हे निर्णायक ठरणार असून राजकीय नेत्यांसह मतदारांना देखील येथून टिंगरे विरुद्ध टिंगरे अशी लढत पाहण्याची शक्यता नाकारता येत नसून या गटातून बहुजन समाज पार्टीचे राजेश भेंगळे हे देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.

याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून ओबीसी महिला प्रवर्गातून प्रभागातून तीन वेळेस निवडून आलेल्या रेखा टिंगरे ह्या उमेदवारीसह विजयाच्या दावेदार म्हणून मानल्या जात आहे.

मागील निवडणुकीत पक्षाचे तीन उमेदवार जरी पराभूत झाले असले तरी पण त्यांच्या रूपाने निवडणुकीत विजयी होऊन स्वतःचा गड राखण्यात यश मिळविले होते.

मतदारांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना तीन वेळेस पालिकेत जाण्याची संधी दिल्याने त्यांनी देखील जनतेच्या विश्वासाला तडा जाऊन न देता नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास भर दिला त्यांनी दिला असून प्रभागात या पक्षाकडून प्रगती रावते देखील उमेदवारीच्या रिंगणात असून भाजपकडून महिला उमेदवारांची चाचपणी केली जात असताना सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी वंदना खांदवे, पूजा जाधव यांच्यामध्ये या प्रवर्गासाठी उमेदवारी मिळविण्यासाठी रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

पण सात वर्षापूर्वी पालिकेत समावेश करण्यात आलेल्या लोहगाव परिसरातून पोरवाल रोड व काही भागाचा या प्रभागात नव्याने समावेश करण्यात लोहगाव परिसरातील राजकारणातून नेहमी विकासकामांना चालना देणारे संतोष खांदवे यांच्या पत्नी वंदना खांदवे यांनी देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची जय्यत तयारी केली असून लोहगाव परिसरात त्यांचे पती संतोष खांदवे यांनी राजकारणाला प्राधान्य न देता समाजकारणाच्या माध्यमातून लोहगाव भागाचा केलेला कायापालट हा संतोष खांदवेंचा असलेला अनुभव वंदना खांदवे यांच्या पाठीशी असून याच प्रवर्गातून सामाजिक कार्यकर्ते धनंजय जाधव यांनी देखील पत्नी पूजा जाधव यांच्या उमेदवारीसाठी पक्षाकडे दावा केला असून उमेदवारी मिळविण्यासाठी त्यांनी देखील कंबर कसली असून या दोन महिला उमेदवारांपैकी पक्षश्रेष्ठी कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालणार हे निर्णायक ठरणार असून दोन्ही इच्छुक महिला उमेदवारांच्या पतींना राजकारणातील आखाड्यात उतरून निवडणुकीतील उमेदवारीचा आखाडा मारण्यासाठी तरबेज असून या दोघांचा अनुभव त्यांच्या पाठीशी असला तरी पण धर्मपत्नींना उमेदवारी मिळविण्यास कोण? बाजी मारणार हे येणाऱ्या काही दिवसातच कळेल. याचबरोबर बहुजन समाज पार्टीकडून मेनका जितेंद्र कराळेकर ह्या देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छुक आहेत.

**एससी प्रवर्गातून भाजपकडे महिला इच्छुक उमेदवारांची मांदियाळी दिसून येत असून या प्रभागातून मीना माने, वैशाली जगताप, ऐश्वर्या जाधव ह्या महिला उमेदवार इच्छुक असून राष्ट्रवादीकडून आरती चव्हाण, संगीता दांगट तर बहुजन समाज पार्टीकडून सुरेखा वाघमारे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही तर एसटी प्रवर्गातून मारुती सांगडे, अविनाश सांगडे यांची नावे चर्चेत असली तरी पण या प्रभागात सर्वसाधारण पुरुष प्रवर्गात टिंगरे विरुद्ध टिंगरे या दोन उमेदवारांमध्ये काटे की टक्कर लढत होऊन कोण?दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आखाड्यात उतरण्यासाठी एकमेकांविरोधात दंड थोपटले असले तरी पण या प्रभागातून कोणता उमेदवार निवडणुकीचा आखाडा मारण्यास सज्ज होणार हे पुढील महिन्यात समजणार आहे.तर ओबीसी महिला उमेदवारांमध्ये देखील होणारी लढत अटीतटीची होणार असल्याचे स्पष्ट बोलले जात असून अनुसूचित जाती प्रवर्गातून(एससी) कोणत्या महिला उमेदवारांना तिकीट मिळेल हे त्यांनी केलेल्या कार्यावर अवलंबून असले तरी पण प्रभागात होणाऱ्या लढती हा अतिशय चुरशीच्या होणार असल्याचे राजकीय नेतेच नाही तर मतदारांमध्ये जोरदार चर्चा रंगली आहे.**

## थोडक्यात पण महत्वाचे



### नागरिकांचे पोलिसांना निवेदन

**पुणे : हॅलो प्रभात**

विश्रांतवाडी भिमनगर परिसरात अलीकडच्या काळत संशयस्पद हालचाली चोरी सार्वजनिक ठिकाणी दारू पिणे,धूम्रपान करणे,टोळया करून अश्लील भाषेत मोठमोठ्याने बोलणे,महिला व जेष्ठ नागरिकांना त्रास देणं इत्यादी गुन्हेगारी कृत्यांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.गुन्हेगारीला आळा बसावा यासाठीरात्रीच्या वेळीपोलीस गस्त सुरु करण्यात यावी यासाठी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन ला निवेदन देण्यासाठी भिमनगर मधील जेष्ठ नागरिक हरिभाऊ लंगोटे, जीवनज्योती प्रतिष्ठान चे अध्यक्ष विनोद गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विशाल भोसले, रमेश चव्हाण, सुरेश किर्ते,संतोष पिल्ले,धम्मानंद तरकसे, गोविंद म्हस्के, गौतम पंडागळे राहुल भोसले, मिट्टू सोनवणे,शुभम देवकुळे,शुभम वाघमारे,भिमनगर मधील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

### चंगेज मुलतानी उद्धवसेनेत

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरेंची उद्धवसेना आणि राज ठाकरेंची मनसे हे पक्ष एकत्र लढणार आहेत. तर काँग्रेस या निवडणुकीला स्वबळावर सामोरा जाणार आहे हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी स्वबळावर लढणाऱ्या काँग्रेसचे माजी नगरसेवक आणि नेते गळाला लावण्यास सुरुवात केली आहे. आज काँग्रेसचे माजी नगरसेवक चंगेज मुलतानी यांना आज उद्धवसेनेत प्रवेश देत उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. चंगेज मुलतानी हे जोगेश्वरी पश्चिम भागातील काँग्रेसचे नगरसेवक होते. मुलतानी यांनी आज मातोश्री येथे उद्धव ठाकरे यांची भेट घेत उद्धवसेनेत प्रवेश केला. उद्धव ठाकरे यांनी चंगेज मुलतानी यांच्या हातात शिवबंधन बांधत त्यांना उद्धवसेनेत प्रवेश दिला. दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उद्धवसेना आणि मनसे यांच्यातील युतीची घोषणा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन केली होती. युतीबाबत एकमत झालं असलं तरी उद्धवसेना आणि मनसे नेमक्या किती जागांवर लढणार हे अद्याप जाहीर झालेलं नाही.

### एमआयएममध्ये 'राडा'; अधिकृत उमेदवारावर कार्यकर्त्यांचाच हल्ला!

**छत्रपती संभाजीनगर : हॅलो प्रभात**

शहरातील एमआयएम पक्षातील अंतर्गत धुसफूस आता रस्त्यावर आली आहे. एमआयएमने महापालिकेसाठी दोन दिवसांपूर्वीच जाहीर केलेल्या आठ उमेदवारांच्या यादीवरून पक्षात मोठे बंड पाहण्यास मिळत आहे. प्रभाग क्रमांक १२ मधील अधिकृत उमेदवाराने शुक्रवारी सायंकाळी काढलेल्या रॅलीवर पक्षातीलच नाराज गटाच्या समर्थकांनी हल्ला केल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी दोन दिवसांपूर्वी आठ उमेदवारांची घोषणा केली होती. या यादीमुळे अनेक इच्छुकांचे पत्ते कट झाल्याने नाराजी पसरली होती. प्रभाग १२ चे अधिकृत उमेदवार शुक्रवारी सायंकाळी ५:३० वाजता किराडपुरा भागातून रॅली काढत असताना, राममंदिर रोडवर ही दुर्घटना घडली. एका माजी नगरसेवकाचे समर्थक तिथे आले आणि त्यांनी अचानक रॅलीवर हल्ला चढवला.

## ४ दिवसांत तब्बल साडेसहा हजार उमेदवारी अर्जांची विक्री

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्याच्या चौथ्या दिवशी तब्बल २ हजार ६६४ अर्जांची विक्री झाली. त्यानुसार आतापर्यंत सुमारे साडेसहा हजार अर्जांची विक्री झाली आहे. महापालिकेच्या निवडणूक विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार शुक्रवारी (दि. २६) सर्वाधिक अर्ज विक्री कोथरूड-बावधन निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून झाली असून कसबा-विश्रामबागवाडा कार्यालयातून सर्वात कमी विक्री नोंदविण्यात आली आहे. तसेच शुक्रवारीच आठ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेला गती आली आहे. शहरातील ४१ प्रभागांतून १६५ नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कार्यालये स्थापन करण्यात आली असून, उमेदवारी अर्जांच्या विक्रीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत एकूण ६ हजार ४३७ अर्जांची विक्री झाली असून शुक्रवारी २ हजार ६६४ अर्जांची विक्री करण्यात आली. शुक्रवारी कोथरूड-बावधन कार्यालयातून ५६७ अर्जांची विक्री झाली. त्याखालोखाल येरवडा-कळस-धानोरी (२२९), भवानी पेठ (२२३), हडपसर-मुंढवा (१७६), वारजे-कर्वेनगर (१७४), बिबवेवाडी (१६७), शिवाजीनगर-घोले रोड (१६६) आणि वानवडी-रामटेकडी (१६४) कार्यालयांचा क्रम लागतो. कसबा-विश्रामबागवाडा कार्यालयातून ८७ अर्जांची विक्री झाली आहे.

## डिजिटलच्या युगातही वर्तमानपत्राचे महत्त्व अबाधित

**पुणे : हॅलो प्रभात**

आजचा काळ हा डिजिटल क्रांतीचा आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे माहिती क्षणात उपलब्ध होते. बातम्या, घडामोडी, विश्लेषण एका क्लिकवर वाचता येतात. मात्र या झपाट्याने बदलणाऱ्या डिजिटल युगातही वर्तमानपत्राचे महत्त्व कमी झालेले नाही, उलट त्याची गरज अधिक ठळकपणे जाणवू लागली आहे.

डिजिटल माध्यमांवर माहिती वेगाने पोहोचते, पण त्या माहितीची सत्यता, विश्वासार्हता आणि पडताळणी हा मोठा प्रश्न ठरतो. सोशल मीडियावर अपुरी, चुकीची किंवा अफवांवर आधारित माहिती मोठ्या प्रमाणात पसरते. अशा वेळी वर्तमानपत्र हे विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून आजही समाजात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.



संपादकीय जबाबदारी, बातमीची तपासणी, स्रोतांची खातरजमा आणि संतुलित मांडणी ही वर्तमानपत्राची खरी ताकद आहे.

वर्तमानपत्र केवळ बातम्यांचे संकलन नसून समाजाचे आरसेदार माध्यम आहे. राजकारण, सामाजिक प्रश्न, शेती, शिक्षण, आरोग्य, अर्थकारण यावर सखोल विश्लेषण आणि विचारपूर्ण लेखन वर्तमानपत्रातूनच वाचायला मिळते. संपादकीय, लेख, स्तंभ आणि विशेष पुरवण्या वाचकांना विचार करायला प्रवृत्त करतात. डिजिटल माध्यमांतील झटपट माहितीपेक्षा वर्तमानपत्र वाचकांमध्ये वैचारिक समृद्धी निर्माण करते.

ग्रामीण भागात आजही वर्तमानपत्र हे माहितीचे प्रमुख माध्यम आहे. इंटरनेटची मर्यादा असलेल्या भागात वर्तमानपत्र समाजजागृतीचे कार्य करत आहे. शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी वर्तमानपत्र हे विश्वासाचं आणि जवळचं माध्यम आहे. सकाळी चहासोबत वर्तमानपत्र वाचण्याची सवय ही केवळ दिनक्रमाचा भाग नसून सामाजिक संस्कृतीच बनली आहे.

डिजिटल युगात अनेक वर्तमानपत्रांनीही काळानुरूप बदल स्वीकारले आहेत. ई-पेपर, संकेतस्थळे, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून त्यांनी आपली व्याप्ती वाढवली आहे. मात्र तरीही छापील वर्तमानपत्राची विश्वासार्हता, सखोलता आणि टिकाऊपणा याला पर्याय नाही.

म्हणूनच असे म्हणावे लागेल की, डिजिटल युग आले तरी वर्तमानपत्राचे महत्त्व अबाधित आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी सत्य, विश्वास आणि जबाबदारी यांची कास धरणारे वर्तमानपत्र हे लोकशाहीचे चौथे स्तंभ म्हणून कायम राहणार आहे.

# सूस व म्हाळुंगेचा पाणी प्रश्न मिटणार

## पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नांना यश



**"सूस व म्हाळुंगे परिसरातील वाढती लोकवस्ती आणि पाणीटंचाई लक्षात घेता मुळशी धरणातून पाणी आणण्याची आवश्यकता आम्ही सातत्याने मांडत होतो. आज राज्य मंत्रिमंडळाने या योजनेला तत्वत: मंजुरी दिल्याने आमचा पाठपुरावा सफल झाला आहे. उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वामुळेच हा निर्णय शक्य झाला, असे मी ठामपणे सांगू इच्छितो. मुळशी धरणातील वीज निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या वेस्टेज पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करण्याचा निर्णय हा अत्यंत लोकहिताचा आहे. यामुळे सूस, म्हाळुंगे तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना दीर्घकालीन दिलासा मिळणार आहे."**

**-बाबुराव चांदेरे (मा.अध्यक्ष- स्थायी समिती, पुणे मनपा)**

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मुळशी धरणातून पाणी आणण्याच्या प्रस्तावाला अखेर राज्य मंत्रिमंडळाची तत्वत: मान्यता मिळाली असून, या निर्णयामुळे सूस व म्हाळुंगेसह पुणे शहराच्या पश्चिम भागाला दिलासा मिळणार आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. पुणे शहरासह सूस व म्हाळुंगे या भागात झपाट्याने वाढणाऱ्या नागरी वस्तीमुळे पिण्याच्या पाण्याची गरज दिवसेंदिवस वाढत असून, भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक होती. याच पार्श्वभूमीवर, यापूर्वी पुणे शहराच्या उत्तर भागासाठी भामा-आसखेड धरणाचे पाणी आणण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या योजनेच्या लोकार्पण सोहळ्यादरम्यान, पुणे महानगरपालिकेच्या सभागृहात तत्कालीन विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या उपस्थितीत स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाबुराव चांदेरे आणि माजी महापौर दत्तात्रय धनकवडे यांनी मुळशी धरणातून सूस म्हाळुंगेसह पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या पश्चिम भागाला पाणीपुरवठा करण्याची मागणी लेखी स्वरूपात मांडली होती. या मागणीची दखल घेत अजित पवार यांनी आपल्या भाषणात मुळशी धरणातून वीज निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या वेस्टेज पाण्याचा पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करण्याचा प्रस्ताव मांडला. टाटा हायड्रो पॉवर कंपनीला सोलर व पर्यायी ऊर्जेची सुविधा उपलब्ध करून देत, पिण्याचे पाणी पुणे शहरासाठी वापरण्याबाबत राज्य शासनाने पुढाकार घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद देत, यासाठी लवकरच समिती नेमून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे जाहीर केले होते. अखेर, राज्य मंत्रिमंडळाने मुळशी धरणातून सुस व म्हाळुंगेसह पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या पश्चिम भागाला पाणी देण्याच्या योजनेला तत्वत: मंजुरी दिली आहे. तसेच, नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांबाबत पाणीपुरवठा, सांडपाणी, रस्ते व घनकचरा व्यवस्थापनाचे सर्व अधिकार पुणे महानगरपालिकेकडे देण्याचा निर्णयही पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्तक्षेपामुळे शासन स्तरावर घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे सुस व म्हाळुंगेसह पुणेकर आणि पिंपरी-चिंचवडकर नागरिकांना भविष्यातील पाणीपुरवठ्याबाबत दिलासा मिळाला आहे.

## भाजपची पहिली उमेदवारी यादी रविवारी प्रसिद्ध होणार

**पिंपरी चिंचवड : हॅलो प्रभात**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी विधानसभानिहाय उमेदवारांचा आढावा घेतला असून, उमेदवारांची पहिली यादी रविवारी (दि. २८) प्रसिद्ध करण्यात येईल अशी माहिती पिंपरी चिंचवड निवडणूक प्रचार प्रमुख आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी (दि. २६ ) हि माहिती दिली. आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, दोन दिवसात उमेदवार यादी जाहीर करण्यात येणार आहे. पालिका निवडणुकीसाठी भाजपच्या उमेदवारांची अंतिम यादी आम्ही प्रदेश कार्यालयाकडे पाठविली आहे . मुंबईत या संदर्भात बैठक झाली. बैठकीला सर्व कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. उमेदवारांचा विधानसभा निहाय आढावा या बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे. ज्या प्रभागांमध्ये उमेदवारी निश्चित आहे त्या नावांना अंतिम मान्यता देण्यात आली असली तरीही अंतिम निर्णय हा पक्षश्रेष्ठींचाच असणार आहे. त्यानुसार प्रदेश आणि कोअर कमिटी याबाबत निर्णय घेईल.

भारतीय जनता पक्ष हा विकासाचे व्हिजन पुढे ठेवून काम करणारा पक्ष आहे. त्यामुळे विरोधक कितीही एकत्र आले तरीही त्याचा आमच्या पक्षावर परिणाम होणार नाही.

आमच्या उमेदवारांचा विजय हा निश्चित आहे. भारतीय जनता पक्षामध्ये सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांना वेळोवेळी न्याय देण्यात येतो हा इतिहास आहे. कुठल्याही परिस्थितीत निष्ठावंत कार्यकर्त्यावर पक्षाकडून अन्याय होत नाही त्यामुळे आमच्या उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतरही कोणत्याही प्रभागात नाराजी दिसून येणार नाही. भारतीय जनता पक्ष हा जगातील सर्वात जास्त सदस्य संख्या असलेला पक्ष आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये येऊन विकासाचे व्हिजन घेऊन कोणी काम करण्यासाठी इच्छुक असेल तर पक्षाकडून त्याचे स्वागतच केले जाते असे देखील आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले.



## थोडक्यात पण महत्वाचे

### राहुरी फॅक्टरी येथे ख्रिस्ती वधू-वर परिचय मेळावा

**राहुरी : हॅलो प्रभात**



प्रगत पदविधर संघटनेच्या स्नेहवर्धिनी वधू-वर सूचक मंडळातर्फे ८६ वा सर्वपंथीय राज्यस्तरीय ख्रिस्ती वधू-वर परिचय मेळावा रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राहुरी फॅक्टरी (ता. राहुरी) येथील फातीमा माता चर्च येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास बहुसंख्य इच्छुक ख्रिस्ती वधू-वर तसेच त्यांच्या पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रगत पदविधर संघटनेचे राहुरी येथील ज्येष्ठ विधिज्ञ व नोटरी पब्लिक ॲड. प्रकाश संसारे यांनी केले आहे. सदर मेळावा हा राहुरी फॅक्टरी येथील प्रमुख धर्मगुरू रेव्ह. फा. प्रकाश राऊत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. राज्यभरातून विविध पंथांतील ख्रिस्ती समाजातील वधू-वर या मेळाव्यात सहभागी होणार असल्याने या उपक्रमाकडे विशेष लक्ष लागले आहे. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रगत पदविधर संघटनेचे पदाधिकारी नरेश चव्हाण, अविनाश यादव, राजेंद्र चक्रनारायण, अंतोन त्रिभुवन, रमेश बनसोडे, विनायक त्रिभुवन, विजय त्रिभुवन, फ्रान्सीस बोर्जेस, ज्यो दिवे, सतीश पाटोळे, ॲड. प्रमोद सगळगिळे, रत्नाकर दोंदे, फकिरा कदम, निर्मला राजू साळवे, भिका ओहळ गुरुजी, मोनिका सुरेश केदारी, वसंत सांगळे आदी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. समाजहिताचा व विवाह जुळविण्याचा महत्त्वाचा उपक्रम असल्याने या वधू-वर परिचय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. प्रकाश संसारे यांनी पुन्हा एकदा केले आहे.

### ट्रॅक्टर कर्जात ४.८२ कोटींचा घोटाळा

**राहुरी : हॅलो प्रभात**

■ एल अँड टी फायनान्स कंपनीच्या ६९ जणांवर गुन्हा

एल अँड टी फायनान्स कंपनीच्या ट्रॅक्टर कर्ज वितरण प्रकरणात मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी ६५ कर्जदार व ४ सेल्स एक्झिक्युटीव्ह अशा एकूण ६९ जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे तालुक्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. एल अँड टी फायनान्सचे झोनल सेल्स मॅनेजर योगेश छगन सूर्यवंशी (रा. पुणे) यांच्या फिर्यादीत नमूद केल्यानुसार, ऑगस्ट २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत राहुरीसह श्रीरामपूर, पारनेर, राहता, नेवासा, संगमनेर, श्रीगोंदा व अहिल्यानगर येथील ६५ जणांनी ट्रॅक्टर खरेदीसाठी कर्ज घेतले होते. सेल्स एक्झिक्युटीव्हनी कर्जदारांची कागदपत्रे स्वीकारून ४ कोटी ३ लाख ४० हजार ४७५ रुपये कर्ज वितरित केले. त्यानंतर कर्जदारांनी हप्ते न भरल्याने तपास करण्यात आला असता, खोटे पत्ते, बनावट छायाचित्रे व संगनमत करून कर्ज उचलल्याचे निष्पन्न झाले. परिणामी व्याजासह ४ कोटी ८२ लाख ७७ हजार ६२५ रुपयांची फसवणूक झाल्याचे उघड झाले. या प्रकरणी चार सेल्स एक्झिक्युटीव्हसह ६५ कर्जदारांविरुद्ध गुन्हा रजि. नं. १३९६/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३३६(२), ३३५, ३१८(४), ३१६(५), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ करीत आहेत.

### छेडछाड करून २५ लाखांची वीजचोरी

**राहुरी : हॅलो प्रभात**

■ महावितरणची मोठी कारवाई, पोलिसांत गुन्हा दाखल

राहुरी शहरातील कॉलेज रोड परिसरातील पारस डेअरी येथे औद्योगिक वीज मीटरमध्ये जाणीवपूर्वक छेडछाड करून मोठ्या प्रमाणावर वीजचोरी केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महावितरणच्या भरारी पथकाने केलेल्या तपासणीत तब्बल २१ महिन्यांत १ लाख १ हजार १०२ युनिट्सची वीजचोरी झाल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणी २५ लाख ९ हजार ३०० रुपयांचे देयक ठोठावण्यात आले आहे. मात्र ही रक्कम न भरल्याने संबंधित ग्राहकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणच्या सहाय्यक अभियंता धनंजय एकबोटे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्यानुसार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी पारस डेअरीतील औद्योगिक वीज कनेक्शनची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मीटर उंच ठिकाणी बसवलेले असून त्यामध्ये छेडछाड झाल्याचे आढळून आले. अचूकता तपासणीमध्ये मीटर ५३.९४ टक्के मंद गतीने वीज नोंदवत असल्याचे स्पष्ट झाले. पुढील चाचणीत आर व बी फेजच्या वायर कापून मीटरमध्ये छेडछाड करण्यात आल्याचे उघड झाले. या प्रकरणात ग्राहक राजेंद्र रोकडे यांनी जाणीवपूर्वक वीजचोरी केल्याचे सिद्ध झाले असून, देयक न भरल्याने राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### कबड्डी क्षेत्राला नवे बळ; विवेक कोल्हे राज्य उपाध्यक्षपदी विराजमान

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



ॲमेचर कबड्डी फाउंडेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्याच्या कबड्डी असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी युवा नेते विवेक कोल्हे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. खेळ, संघटन आणि नेतृत्व यांचा प्रभावी समन्वय साधणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या विवेक कोल्हे यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, या निवडीचे क्रीडा क्षेत्रातून स्वागत होत आहे. सन २०२५ ते २०२९ या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य ॲमेचर कबड्डी असोसिएशनच्या अध्यक्षपदी राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांची निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नव्या कार्यकारिणीची रचना करण्यात आली असून, याच कालावधीत कबड्डी असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी विवेक कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवड कबड्डी चळवळीला बळ देणारी ठरणार आहे. या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात कबड्डी खेळाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ग्रामीण व शहरी भागातील होतकरू खेळाडूंना योग्य व्यासपीठ, प्रशिक्षण, स्पर्धात्मक संधी आणि संघटनात्मक पाठबळ देण्यासाठी ठोस धोरणे राबविली जातील, अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली आहे.

# नगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर

## स्वच्छता मोहीमेच्या आवाहनाला कोपरगावकरांचा प्रतिसाद

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पराग संधान यांच्या मार्गदर्शनाने नगरपालिकेचे प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले असून, कोपरगाव नगरपरिषदेची निवडणूक संपन्न होताच विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्याच पार्श्वभूमीवर कोपरगाव शहरातील विविध प्रभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेला समस्त कोपरगावकरांनी चांगला प्रतिसाद देत उपक्रमाचे स्वागत केले आहे. नगरपालिका निवडणुकीदरम्यान नागरिकांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या उद्देशाने युवा नेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान यांनी कोपरगाव शहरातील विविध प्रभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून आदर्शवत नेतृत्व असल्याचे सिद्ध केले असून, प्रशासनाला सोबत घेऊन त्यांनी जोमाने कामाला सुरुवात केली आहे. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला असून, नूतन नगराध्यक्ष स्वतः शहराची स्वच्छता करण्यासाठी नगरपालिकेच्या प्रशासनासोबत सकाळीच कोपरगाव शहरात उपस्थित राहिले. स्वच्छतेच्या दिशेने टाकलेले पाऊल नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरणार आहे.

परिणामी, शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण होत आहे.

युवा नेते विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली नूतन नगराध्यक्ष पराग संधान यांनी नगरपालिका निवडणुकीदरम्यान दिलेल्या



आश्वासनांची पूर्तता करण्यास सुरुवात केली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष जाहीर करण्यात आलेल्या विश्वासार्ह जाहीरनाम्यानुसार कोपरगाव शहर विकासाच्या दिशेने ठोस पाऊल टाकत आहे. पहिल्या शंभर दिवसांत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, त्यासाठी सर्वप्रथम स्वच्छता मोहिमेवर विशेष भर देण्यात येत आहे.

नगरपालिकेच्या प्रशासनाशी समन्वय साधत प्रत्येक प्रभागातील समस्या व अडीअडचणी जाणून घेऊन नागरिकांच्या हितासाठी ठोस आणि प्रभावी निर्णय घेतले जात आहेत.

शहरव्यापी स्वच्छता अभियान या मोहिमेअंतर्गत प्रभाग क्रमांक 6 येथे स्वच्छता अभियानास सुरुवात झाली.याप्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक विक्रमादित्य सातभाई, आशिष निकुंभ ,यश काले, ओम बागुल,नितीन जोशी, कुणाल कुरे, शुभम भावसार,योगेश अमृतकर, निखिल जोशी, सनी खैरे तसेच इतर युवा कार्यकर्ते, नगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रसंगी नवनियुक्त नगराध्यक्ष पराग संधान, अतुल काले,आनंद काले यांनी सदिच्छा भेट दिली.

## पोलीस निरीक्षक सचिन हिरेंना निलंबित करा, गुन्हा दाखल करा

**रायगड : हॅलो प्रभात**

खोपोलीमध्ये एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेळ काळोखे यांची निर्घुण हत्या करण्यात आली. खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्याकडे मंगेळ काळोखे यांनी त्यांच्या जीवाला धोका असल्याची तक्रार देऊनही कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप काळोखे कुटुंबीयांनी केला. पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे. मंगेश काळोखे यांनी या आधी खोपोली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली होती. आपल्या जीवाला धोका असल्याची तक्रार त्यांनी केली होती. आरोपी रवींद्र देवकर आणि त्याचे साथिदार संशयितरित्या हत्यारे घेवून फिरत आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मंगेळ काळोखे यांनी केली होती. परंतु, पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

## मुळा-निळवंडे धरणातुन शेतीसाठी पाणी सोडा : प्राजक्त तनपुरे

**राहुरी : हॅलो प्रभात**

मुळा धरणाच्या डावा व उजवा तसेच निळवंडे धरणाच्या कालव्या द्वारे शेतीसाठी आर्वतन सोडण्याची मागणी माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केली आहे.

सध्या शेतकऱ्यांची शेतीमध्ये उस, हरभरा, गहु व कांदा या पिकाच्या लागवडीची लगभग चालु आहे. त्यात शेतकऱ्यांना दिवसा लाईट मिळत नसल्याने व रात्री बिबटयाच्या भितीने शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून शेतीला पाणी द्यावे लागत आहे.त्यामुळे शेती करीता दोन्ही धरणातून तात्काळ



आवर्तन सोडावे. मुळा धरणाच्या दोन्ही कालव्या द्वारे तसेच निळवंडे धरणातून तालुक्यातील जिरायत भागातील शेतीसाठी तातडीने पाणी सोडण्याची अतिशय गरज असून सद्या शेतकऱ्यांचा गहू हरभरा ऊस व कांदा पिकाच्या लागवडी सुरु असून या पिकासाठी पाण्याची. तीव्र गरज भासत असल्याने मुळा धरणाच्या दोन्ही कालव्यातून तसेच निळवंडे धरणातून पाणी सोडावे, अशी मागणी तनपुरे यांनी केली आहे.

राहुरी तालुक्यातील मुळा धरणाच्या दोन्ही कालव्याखालील शेतकऱ्यांना शेतात पिकांसाठी सध्या पाण्याची नितांत गरज भासत आहे. शेतकरी नुकताच नैसर्गिक अस्मानी संकटामुळे मोठ्या प्रमाणावर अडचणीत सापडलेला आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कापूस, कांदा, तूर, सोयाबीन पिके मोठया प्रमाणावर ठिकाणी वाया गेली. उसाला तुरे फुटल्याने वजन घटले आहे.यातूनच शेतकरी मोठ्या अडचणीतून मार्ग काढत कांदा, गहू, हरभरा इत्यादी पिकांच्या लागवडी करत आहे. शेतातील पिकांना पाण्याची गरज भासत असल्याने मुळा धरणाच्या दोन्ही कालव्यातून व निळवंडे धरणातून शेतीसाठी पाणी सोडावे, अशी शेतकऱ्यांची मागणी माजी राज्यमंत्री तनपुरे यांनी केली आहे.

## आर.जे.एस. कॉलेजचे उत्कृष्ट संशोधनाचे ध्येय

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

जालिंदर कानवडे

आर.जे.एस. कॉलेज ऑफ फार्मसीने उद्योग–शिक्षण सहकार्य बळकट करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत सिन्नर येथील होल्डन मेडिकल लॅबोरेटरीज प्रा. लि. आणि एन. वी. फार्मा (सिन्नर) यांच्याशी सामंजस्य करार (MoU) केला आहे.करारावर जालिंद्र कानवडे (प्लांट मॅनेजर, होल्डन मेडिकल) आणि निशा बेडीस (QC मॅनेजर, एन. वी. फार्मा) यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. यावेळी महाविद्यालयाचे डॉ.प्रा प्राचार्य नितीन जैन व डॉ. उपप्राचार्य उषा जैन यांनी दोन्ही उद्योगांना भेट दिली. 2019 मध्ये स्थापन झालेल्या आर.जे.एस. कॉलेज ऑफ फार्मसीचे ध्येय औषधशास्त्र क्षेत्रात उत्कृष्ट शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण प्रदान करणे आणि समाजाच्या सेवेसाठी सक्षम,




गुणवत्तापूर्ण व्यावसायिक घडविणे आहे.होल्डन मेडिकल लॅबोरेटरीज ही अत्याधुनिक व अत्युच्च तंत्रज्ञानाचा वापर करून कॅप्सूल्स, टॅब्लेट्स, पावडर इत्यादी विविध उच्च गुणवत्तेच्या औषधी फॉर्मुलेशन (formulations) विकसित करणारी आघाडीची कंपनी आहे. अँटिडायबेटिक, अँटिहायपरटेन्सिव्ह आणि अँटी-इन्फ्लेमेटरी प्रकारचे औषधे तयार करून त्यांची युरोपसह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात केली जाते.

औषधनिर्मिती क्षेत्रातील तज्ज्ञता आणि गुणवत्तेमुळे कंपनीला WHO-GMP, ISO 9001-2001, FDA यांसारखी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे तसेच अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यावेळी बोलताना डॉ. नितीन जैन म्हणाले की, या करारामुळे शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रामधील दुवा अधिक बळकट होणार असून विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन आणि व्यावहारिक अनुभव घेण्याची संधी मिळेल. जालिंदर कानवडे यांनी विद्यार्थ्यांना होल्डन मेडिकल लॅबोरेटरी उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण आणि औषधनिर्माण प्रक्रियेबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याची तयारी व्यक्त केली.

> **या करारामुळे आर.जे.एस. फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नवोन्मेष, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमतेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल.**
> **- चांगदेव कातकडे, आर.जे. एस.फाउंडेशन अध्यक्ष**



## हेडगेवार चौकात मनु स्मृतीचे दहन

**राहुरी : हॅलो प्रभात**

मनुस्मृतिचे दहन वारंवार केले पाहिजे असे प्रतिपादन संजय संसारे यांनी केले. ते विविध मनु स्मृती विरोधक संघटनांमार्फत हेडगेवार चौकात आयोजित केलेल्या मनुस्मृति दहन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिरीष गायकवाड, माजी प्राचार्य सुभाष पोटे व अनुसंगम शिंदे, भूषण साळवे अजय साळवे, किरण माळी विकास बोरुडे, भाऊसाहेब मनतोडे, महेश पवार, सनी राऊत, सौरभ पाटोळे,ओंकार पवार, सोमाजी पवार आदींच्या हस्ते मनुस्मृति दहन करण्यात आले. याप्रसंगी श्री संसारे पुढे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 25 डिसेंबर 19 27 ला रायगड जिल्ह्यातील महाड येथे मनुस्मृतीचे दहन केले. ही मनुस्मृती स्त्रियांना गैरबरोबरीच्या वागणूक देते. सतीच्या चालीला समर्थन देते. अस्पृश्यताला खतपाणी घालते. या प्रवृत्ती अद्यापही जिवंत आहेत. विषमतावादी समाजव्यवस्था प्रस्थापित करते. यामुळे वारंवार मनुस्मृतीचे दहन केले जावे. असे प्रतिपादन त्यांनी शेवटी केले. याप्रसंगी मनुस्मृतीची मुखपृष्ठे आणि पाने सामूहिकरीत्या हेडगेवार चौकात जाळण्यात आली.

# साईबाबांचे मंदिर ३१ डिसेंबरला दर्शनासाठी रात्रभर उघडे राहणार

**शिर्डी : हॅलो प्रभात**

विनोद जवरे

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने चालु वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागता निमित्त आयोजित करण्यात आलेल्या दि. 25 डिसेंबर 2025 ते 01 जानेवारी 2026 शिर्डी महोत्सवाची तयारी पुर्ण झाली असुन यानिमित्ताने दि. 30 डिसेंबर 2025 ते 01 जानेवारी 2026 अखेर 03 दिवस विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. श्री. गाडीलकर म्हणाले, दरवर्षी नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागता निमित्त श्रींच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. संस्थानकडे शिर्डी महोत्सवाकरीता वेगवगळया ठिकाणांहुन येणा-या 53 पालख्यांनी नोंदणी केलीली आहे. या येणा-या साईभक्तांची होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून



मंदिर परिसरात तसेच अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी साईधर्मशाळा व भक्तनिवासस्थान (500 रुम) या ठिकाणी 46 हजार चौरस फुटाचे मंडप उभारण्यात आलेले आहे. साईभक्तांकरीता सुमारे 120 क्विंटल साखरेचे मोफत बुंदी प्रसाद पाकीटे व सुमारे 400 क्विंटल साखरेचे मोतीचूर लाडू प्रसाद पाकीटे तयार करण्यात येणार असून उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहजतेने उपलब्ध व्हावे यासाठी नविन दर्शन रांग, श्री साईनाथ मंगल कार्यालय, व्दारकामाई समोरील खुले नाट्यगृह, मारुती मंदिरा शेजारी साईकॉम्प्लेक्स, गेट नंबर 04 चे आतील बाजू, श्री साईप्रसादालय, सेवाधाम इमारत, व सर्व निवासस्थाने आदी ठिकाणी लाडू विक्री केंद्र उभारण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यकता भासल्यास अतिरिक्त लाडू विक्री केंद्र उभारण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच दर्शनरांगेत व परिसरात भक्तांना चहा, कॉफी, दुध व मिनीरल वॉटर सुलभतेने मिळावे यासाठी साई कॉम्प्लेक्स, साईआश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, भक्तनिवासस्थान (500रुम), व्दारावती भक्तनिवासस्थान तसेच साई उद्यान इमारत परिसर, नविन दर्शन रांग इमारत, शांतीनिवास इमारतीतील दर्शनरांग येथे अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे. याकालावधीत भक्तांच्या आरोग्य सुविधेसाठी विविध ठिकाणी प्रथमोपचार केंद्राची व्यवस्था करण्यात येणार असुन तातडीचे सेवेसाठी रुग्णवाहीका तैनात ठेवण्यात येणार आहे. तसेच सुरक्षेकामी पोलिस निरिक्षक, पोलिस उपनिरिक्षक, पोलिस कर्मचारी, एक शिघ्र कृतीदल पथक, एक बॉम्ब शोधक पथक तैनात असून बंदोबस्तासाठी अतिरिक्त पोलिस निरिक्षक, सहाय्यक पोलिस निरिक्षक, पुरुष पोलिस कर्मचारी व महिला पोलिस कर्मचारी तैनात करण्यात येवून याव्यतिरिक्त संस्थानचे पोलिस निरिक्षक व सुरक्षा कर्मचारी असे एकुण 1000 हून अधिक कर्मचारी कार्यरत राहणार आहे.

बुधवार दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी समाधी मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर उघडे राहणार असल्यामुळे या दिवशी रात्रौ 10.00 वाजता होणारी शेजारती व दिनांक 01 जानेवारी 2026 रोजीची पहाटे 05.15 वाजताची काकड आरती होणार नाही. नाताळ सुट्टी, चालु वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागता निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रुपरेषा पुढिलप्रमाणे दि. 30 डिसेंबर रोजी सकाळी 10.00 ते 11.30 यावेळेत श्री. प्रविण महामुनी, शिर्डी यांचा एक शाम साई के नाम हा कार्यक्रम, दुपारी 01.00 ते 03.00 यावेळेत भजन सम्राट, श्री नाना वीर, शिर्डी यांचा साईंची भजने हा कार्यक्रम, दुपारी 03.30 ते 05.30 वा. श्री. लक्ष चावला, हरियाणा यांचा साईभजन संध्या कार्यक्रम, सायं. 07.00 ते 09.30 यावेळेत साई सुमिरण वाद्य वृंद, बोरिवली (पुर्व) यांचा साई सुमिरन हा कार्यक्रम, दि. 31 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10.30 ते 11.30 यावेळेत श्री दासगणु महाराज जयंती निमित्त सामुहिक स्तवन मंजरी वाचन, दुपारी 01.00 ते 03.00 वा.सारेगमप ऑर्केस्ट्रा, संगमनेर यांचा साईभजन संध्या, दुपारी 03.30 ते 05.30 वा. साई स्वरांजली म्युझिकल ग्रुप, नागपुर यांचा साई भजन संध्या कार्यक्रम, सायं. 07.00 ते 09.00 यावेळेत ह.भ.प. सोनाली दिदी करपे, नांदेड यांचा किर्तन सेवा कार्यक्रम, रात्रौ. 10.30 ते 12.00 यावेळेत जगदिश पाटील, ठाणे (वेस्ट) यांचा साई पालखीची भजने, तसेच दि. 01 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 वा. श्री मिनू सचदेवा, साई आशिर्वाद ग्रुप, लखनऊ यांचा साईभजन संध्या कार्यक्रम, दुपारी 01.00 ते 03.00 वा. आर. डी. म्युझीक अकॅडमी, श्रीरामपुर यांचा साईभजन संध्या कार्यक्रम, दुपारी 03.30 ते 05.30 वा. शुभम कुमार गुप्ता, मिर्झापुर यांचा साईभजन संध्या कार्यक्रम व सायं. 07.00 ते 09.30 यावेळेत श्री पारस जैन, शिर्डी यांचा साईंची भजने आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे सर्व कार्यक्रम हनुमान मंदिराशेजारील श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपातील स्टेजवर होणार असल्याचे सांगुन शिर्डी महोत्सवानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या साईभजन संध्या कार्यक्रमांचा जास्तीत-जास्त साईभक्त व श्रोत्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.गाडीलकर यांनी केले.